| | |
|---|---|
| दाखल तारीख | २२/०३/२०२४ |
| नोंदणी तारीख | २२/०३/२०२४ |
| निर्णय तारीख | ०९/०७/२०२६ |
| कालावधी | ०२ व.,०२ म., १८ दि.. |
| CNR No.MHGA050001262024 | |

भाग – अ
(न्यायनिर्णयाची शीर्षक पान)
[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४ (१)]

**निशाणी क्र. ०९ खाली**

## न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, देसाईगंज यांचे न्यायालयात.

(पिठासीन अधिकारी – सतिश गो. गोरे)

| | |
|---|---|
| **अपराध क्रमांक व पोलीस स्टेशनचा तपशील** | **अपराध क्र.२५१/२०२३,**<br>पोलीस स्टेशन, देसाईगंज. |
| **न्यायनिर्णयाचा दिनांक** | ०९/०७/२०२६ |
| **प्रकरण क्रमांक** | **संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ८०/२०२४** |
| **अभियोग पक्ष :** | **महाराष्ट्र शासन तर्फे**<br>पोलीस स्टेशन अधिकारी, देसाईगंज,<br>ता. देसाईगंज, जि. गडचिरोली.<br>(गोविंदा अर्जून हाडगे) |
| **अभियोग पक्षातर्फे** | **श्री. आर.डब्ल्यु.सकिनलावार,**<br>विशेष सहायक सरकारी अधिवक्ता |
| **आरोपी :** | **कौशल भुखन यादव,**<br>वय – ३८ वर्ष, धंदा – चालक,<br>रा. जंगलपुर, ता. गेंदाटोला,<br>जि. राजनांदगांव (छत्तीसगड), |
| **आरोपीतर्फे अधिवक्ता :** | **श्री. एम.आर.शेंडे,** |

**भाग – ब**
**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४ (२)]**

| | |
|---|---|
| घटनेचा दिनांक : | २५/०६/२०२३ |
| एफ.आय.आर. दिनांक : | २५/०६/२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक : | २२/०३/२०२४ |
| गुन्ह्याचा तपशील निश्चितीचा दिनांक : | ०६/०२/२०२५ |
| पुराव्यास सुरुवात झाल्याचा दिनांक : | १३/०३/२०२५ |
| निकालाकरिता ठेवल्याचा दिनांक : | ०६/०७/२०२६ |
| निकाल दिनांक : | ०९/०६/२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास तो दिनांक | ---- |

**आरोपीचा तपशील**

| आ. क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामिन तारीख | दोषारोप /आरोप | दोषी / निर्दोष | शिक्षा | तुरुंगामध्ये न्यायालयीन बंदी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **कौशल भुखन यादव** | --- | २२/०३/२०२४ | भा.दं.सं.चे कलम ३०४–अ व २७९ | निर्दोष | नाही | नाही |

**भाग – क**
**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४ (३)]**
**अभियोग पक्ष/ बचाव पक्ष / न्यायालयाने बोलाविलेल्या साक्षदारांची यादी**

| क्र. | नाव | साक्षदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | सचिन दिपक बनारसे (**नि.क्र.०९ च्या पुढे**) | पंच साक्षदार |
| अ.सा.क्र.२ | इम्रान यासिनखान पठाण (**नि.क्र.०९ च्या पुढे**) | पंच साक्षदार |
| अ.सा.क्र.३ | नामदेव काशीनाथ गुरनुले (**नि.क्र.०९ च्या पुढे**) | साक्षदार |
| अ.सा.क्र.४ | सुजाता लक्ष्मण भोपळे (**नि.क्र.०९ च्या पुढे**) | तपासी अधिकारी |

**बचावपक्षातर्फे नोंदविलेल्या साक्षदारांची यादी**

| अ.क्र. | नाव | साक्षेचे स्वरुप |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| ब.सा.क्र. १ | निरंक | निरंक |

न्यायालयातर्फे नोंदविलेल्या साक्षदारांची यादी

| अ. क्र. | नाव | साक्षेचे स्वरुप |
|---|---|---|
| न्या.सा.क्र. १ | निरंक | निरंक |

सरकार पक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | नि.क्र.पी१/पी.डब्ल्यु.४ | घटनास्थळ पंचनामा |
| २ | नि.क्र.पी२/पी.डब्ल्यु.४ | सी.सी.टी.व्ही.फुटेज जप्ती पंचनामा |

बचावपक्षातर्फे मान्य केलेल्या कागदपत्राची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

बचावपक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

न्यायालयातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्राची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

मेटरीअल ऑब्जेक्ट/महत्त्वाच्या वस्तू

| अ. क्र. | मटेरिअल ऑब्जेक्ट /महत्त्वाच्या वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

## :: न्यायनिर्णय ::

(जाहिर दिनांक ०९/०७/२०२६)

आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम २७९, ३०४–अ अन्वये शिक्षेस पात्र असणाऱ्या अपराधाकरिता खटला चालविण्यात आला. अभियोग पक्षाचे कथन,

अभिलेखावरील कागदोपत्री पुरावा लक्षात घेता खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित होतात, त्यांच्या कारणांसह निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष सिद्ध करतो काय की, दि.२५/०६/२०२३ ला अंदाजे १२.३० ते १३:०० वाजताच्या दरम्यान मौजा देसाईगंज, ता. देसाईगंज, जि. गडचिरोली येथील हुतात्मा स्मारक जवळ आरोपीने त्याच्या ताब्यातील ट्रॅव्हल्स क्र. सी.जी./०८–ए.एच.–९९०१ मानवी जीवन धोक्यात येईल अगर क्षती पोहोचण्याचा संभव होईल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने सार्वजनिक रस्त्यावर चालविली ? | **...नकारार्थी** |
| २. | अभियोग पक्ष सिद्ध करतो काय की, वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील उपरोक्त उल्लेखीत वाहन सार्वजनिक रस्त्यावर निष्काळजीपणे, बेदरकारपणे व हयगयीने चालवुन फिर्यादीचा भाऊ होमराज अर्जुन हाडगेला धडक देवुन त्याच्या मृत्युस कारणीभुत ठरला जो की सदोष मनुष्यवध नव्हता ? | **...नकारार्थी** |
| ३. | आदेश काय ? | **...अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

२. आरोपीवरील आरोप सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्षाने सचिन दिपक बनारसे **(अ.सा.क्र.१),** इम्रान यासिनखान पठान **(अ.सा.क्र.२),** नामदेव काशीनाथ गुरनुले **(अ.सा.क्र.३)** व सुजाता लक्ष्मण भोपळे **(अ.सा.क्र.४)** यांची साक्ष नोंदविली. अभियोग

पक्षाने पुरसीस **(नि.क्र.१६)** दाखल करून सरकार पक्षाचा पुरावा बंद केला. आरोपीचा भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ३५१(१)(ब) अन्वयेचा जवाब नोंदविण्यात आला. त्याचा बचाव त्याला खोटया प्रकरणात गुंतविल्याचा आहे. त्याच्या बचावातर्फे कोणताही साक्षदार तपासण्यात आला नाही.

**<u>मुद्दा क्र. १ व २ करीता</u>** :-

**३.** मुद्दा क्र. १ व २ च्या पुराव्यांची पुनरावृत्ती टाळण्याकरिता त्यांचे विवेचन एकत्रितरित्या चर्चीले जात आहे.

**४.** सचिन **(अ.सा.क्र.१)** व इम्रान **(अ.सा.क्र.२)** हे घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच साक्षदार असुन अ.सा.क्र.१ ने घटनास्थळ पंचनाम्यावर त्याची सही नसल्याचे सांगीतले. जेव्हा की, अ.सा.क्र.२ ने त्याची सही असल्याचे सांगीतले परंतु त्यातील मजकुराबाबत अनभिज्ञता दर्शविली.

४. नामदेव **(अ.सा.क्र.३)** प्रत्यक्षदर्शी साक्षदार याने अपघात कसा झाला होता, याबाबत त्याला माहिती नसल्याचे सांगीतले.

५. भोपळे **(अ.सा.क्र.४)** तपासी अधिकारी यांच्या साक्षेत असे आले की, दि. २५.०६.२०२३ ला तिला अपघाताबाबतची माहिती मिळाल्यानंतर ती आठवडी बाजारामध्ये घटनास्थळी गेली होती व अपघातग्रस्त व्यक्तींना सरकारी दवाखाण्यामध्ये पाठविले. अपघातग्रस्त व्यक्ती मयत झाल्याचे माहिती झाल्यानंतर तिने गुन्हयाची नोंद केली

होती. तिथे घटनास्थळाचा पंचनामा **(नि.क्र.पी१/पी.डब्ल्यु.४)** तयार केला. तसेच सी.सी.टी.व्ही. फुटेजची पाहणी करून त्याचा जप्ती पंचनामा **(नि.क्र.पी२/पी.डब्ल्यु.४)** तयार केला. साक्षदारांचे बयान नोंदविले व जप्त वाहनाचे आर.टी.ओ. कडुन निरीक्षण केले.

**१०.** अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, दोन्ही पंच साक्षदार अ.सा.क्र.१ व २ फितुर झालेले आहेत. अ.सा.क्र.३ याने त्याला घटनेबाबत काहीही माहिती नसल्याचे सांगीतले आहे. अ.सा.क्र.४ तपासी अधिकारी असुन तिने घटनास्थळ पंचनामा व सी.सी.टी.व्ही. फुटेज जप्ती पंचनामा तयार केल्याचे सांगीतले आहे. अ.सा.क्र.४ ची साक्ष फक्त त्यापुरती मर्यादीत स्वरूपाची आहे. अभिलेखावर घटना कशी घडली होती, हे दर्शविणारा कोणताही पुरावा आलेला नाही. घटनेचा कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षदार अभियोग पक्षाने तपासलेला नाही. फिर्यादी तसेच तपासी अधिकारी यांना वारंवार साक्ष समन्स काढुन सुध्दा ते साक्षेकरीता हजर झाले नाही. त्यामुळे अभियोग पक्षाने त्यांचा पुरावा बंद केल्याचे दिसुन येते.

**१६.** एकंदरीत दि. २५.०६.२०२३ ला आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन क्र.सी.जी.०८/ए.एच.९९०१ निष्काळजीपणे व बेदरकारपणे मानवी जिवन धोक्यात येईल अशा पध्दतीने हुतात्मा स्मारक, देसाईगंज समोरील सार्वजनिक रस्त्यावर चालविले व होमराज अर्जुन हाडगे यांचा अपघात घडवुन आणला व त्यांच्या मृत्युस कारणीभुत ठरला जो की सदोष मनुष्यवध नव्हता, हे सिध्द करणारा कोणताही पुरावा अभियोग पक्ष

अभिलेखावर आणू शकला नाही, असे मत नोंदवून मुद्दा क्र.१ व २ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवीत आहे.

**मुद्दा क्र. ३ करीताः–**

**१७.** मुद्दा क्र. १ व २ च्या नकारार्थी निष्कर्षास अनुसरुन आरोपी निर्दोष सुटण्यास पात्र आहे. जप्त मुद्देमाल ट्रॅव्हल्स नंबर सी.जी.०८/ए.एच.–९९०१ हे सुप्रतनाम्यावर देण्यात आली किंवा कसे याबाबत अभिलेखावर काहीही नाही. त्यामुळे अपिल कालावधीदरम्यान जर सदर वाहनाच्या मालकाने अर्ज केल्यास ते वाहन त्याला देणे योग्य होईल, अन्यथा अपिल कालावधीनंतर त्या वाहनाचा जाहिर लीलाव करून त्यापासुन आलेली रक्कम सरकार जमा करणे योग्य होईल. जप्त मुददेमाल पेनड्राईव्ह मुल्यहिन असल्यामुळे अपिल कालावधीनंतर तो नष्ट करणे योग्य होईल. आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ४८१(१) ची पुर्तता आधीच केलेली आहे. म्हणून मुद्दा क्र. ३ च्या उत्तरार्थ मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. आरोपीला भा.ना.सु.सं. चे कलम २७८(१) प्रमाणे भारतीय दंड संहिताचे कलम २७९, ३०४–अ नुसार शिक्षेस पात्र असलेल्या अपराधातुन निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचे जामीनबंधपत्र रद्द करण्यात येते.

३. जप्त मुद्देमाल ट्रॅव्हल्स नंबर सी.जी.०८/ए.एच.–९९०१ बाबत अपिल कालावधीदरम्यान जर ट्रॅव्हल्स मालकाने अर्ज केल्यास ते वाहन त्याला देण्यात यावे. अन्यथा अपिल कालावधीनंतर त्या वाहनाचा जाहिर लीलाव

करून त्यापासुन आलेली रक्कम सरकार जमा करण्यात यावी.

४. जप्त मुद्देमाल पेनड्राईव्ह मुल्यहिन असल्यामुळे अपिल कालावधीनंतर तो नष्ट करण्यात यावा.

५. सदर न्यायनिर्णयाची प्रत भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ४०६ च्या पूर्ततेकरिता जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्याकडे पाठविण्यात यावी. **(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला).**

Digitally signed by SATISH GOPALRAO GORE
Date: 2026.07.09 17:37:20 +0530

दिनांक : ०९/०७/२०२६.

**(सतिश गोपालराव गोरे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, देसाईगंज.
JO CODE- MH02902